# जाहिरात

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर कार्यालयाच्या अंतर्गत घटक कार्यालयातील आस्थापनेवरील विधी अधिकारी व विधी अधिकारी गट-ब यांची परिक्षेत्रातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी इच्छुक उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

---

क्र.आस्था-१/कंत्राटी विधी अधिकारी/जाहिरात/भरती/२०२४ कोल्हापूर, दि. .१०.२०२४

मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल याचीका क्र.९१४५/२०१० व ९१६०/२०२० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष हक्क याचिका (Civil) क्र.१९००८-१९००९/२०१२ व विशेष हक्क याचिका (Civil) क्र.३४७८८-३४७८९/२०१२ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतिम आदेशानुसार सदरची पदे भरावयाची असून त्याद्वारे होणा-या नेमणूका मा.सर्वोच्च न्यायालयात न्याय प्रविष्ठ असलेल्या उक्त विशेष याचिकेच्या अंतरिम निर्णयाच्या आधिन राहून असतील.

**कंत्राटी विधी संवर्ग (एकूण २२ पदे)**

महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्रमांक:अेपीओ-३१०६/प्र.क्र.२२७/पोल-३ दि.२१/०८/२००६ व शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक : एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/पोल-१० दि.१५/०९/२००६अन्वयेतसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुबई यांचेकडील पत्र दिनांक ०२.११.२००६ नुसार विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्राकरिता खालील जिल्हयासमोर दर्शविल्या प्रमाणे त्याठिकाणी सध्यस्थितीत रिक्त अलेली विधी अधिकारी व विधी अधिकारीगट(ब)पदे मंजूर असून सदर पदे ११ महिन्याकरिता कंत्राटी पध्दतीनुसार भरावयाचीआहेत.

| अ.क्र. | जिल्हा | विधी अधिकारी-ब | विधी अधिकारी | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| ०१. | कोल्हापूर | ०० | ०१ | ०१ |
| ०२. | सांगली | ०० | ०३ | ०३ |
| ०३. | सातारा | ०० | ०६ | ०६ |
| ०४. | सोलापूर ग्रामीण | ०० | ०३ | ०३ |
| ०५. | पुणे ग्रामीण | ०१ | ०८ | ०९ |
| | एकूण | ०१ | २१ | २२ |

इच्छुक उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजुला ठळक अक्षरात विधी अधिकारी / विधी अधिकारी गट-ब या पदासाठी अर्ज असे स्पष्ट नमूद करुन दोन रंगीत फोटो अर्जासोबत जोडून ते अर्ज जाहीरात प्रसिध्द झाले दिनांकापासून दिनांक ३१/१०/२०२४ पावेतो पोलीस अधीक्षक कार्यालय, रमणमळा, कसवा बावडा, कोल्हापूर-४१६००३ या पत्त्यावर पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. अर्हता प्राप्त उमेदवारांनी त्यांना वर नमूद दोन्ही पदासाठी अर्ज करावयाचे असल्यास ते स्वतंत्रपणे सादर करावेत. मुदतीनंतर या कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवारांनी पत्रव्यवहाराकरिता अर्जासोबत स्वतःचे संपूर्ण नांव व पत्ता लिहीलेले दोन लिफाफे जोडावेत. तसेच अर्जात त्यांच्या दूरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी याचा स्पष्टपणे उल्लेख करावा.वर दर्शविलेल्या पदसंख्येत बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकारी विशेष पोलीस



May 17, 2023, 17:34

महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांना राहतील. तसेच सदरची जाहिरात पोलीस अधीक्षक, कोल्हापूर कार्यालयाच्या https://kolhapurpolice.gov.inया संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**करारातील मासिक देय रक्कम :-**

विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदांकरिता करारातील मासिक देय रक्कम खालील नमुद तक्त्याप्रमाणे देय राहील.सदर रकमेच्या मर्यादेपेक्षा इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय रहाणार नाहीत.

| अ.क्र. | पदाचे नांव | करारातील मासिक देयक रक्कम |
|---|---|---|
| ०१. | विधी अधिकारी गट-ब | रक्कम रुपये २५,०००/- अधिक दूरध्वनी व प्रवास खर्च रु.३,०००/- असे एकूण रुपये २८,०००/- |
| ०२. | विधी अधिकारी | रुपये २०,०००/- अधिक दूरध्वनी व प्रवास खर्च रु.३,०००/- असे एकूण रुपये २३,०००/- |

**शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा व अनुभव :-**

**शैक्षणिक अर्हता व अनुभव**

०१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिटाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.

०२) विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या दोन्ही पदांसाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

०३) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनीक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

०४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**उमेदवाराचे वय :-**

विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

**निवड प्रक्रिया :-**

संपूर्ण निवड प्रक्रिया ही ७५ गुणांची असेल. त्याचे विवरण खालील प्रमाणे -

**अ) लेखी परिक्षा - ५० गुण, वेळ - १ तास**

**वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी (Objective And Descriptive Type) - ५० गुण**

सेवा विषयक व फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणांमध्ये, तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रकरणांमध्ये तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम २१८ किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम १९९९ मधील प्रकरणांत अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यासाठी सक्षम प्राधिका-यास सुलभ निर्णय घेता येईल अशा प्रकरणांची छाननी करण्याची क्षमता तपासणारे प्रश्न तसेच सध्याची न्यायीक स्थिती (Settle Postion of Law) काय आहे तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ बाबतच्या ज्ञानाचे आकलन करणा-या प्रश्नांचा समावेश असेल.

भारतीय दंड संहिता १८६०, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७५, भारतीय पुरावा कायदा, भारतीय साक्ष अधिनियम २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३, फौजदारी न्यायनिवाडे, किरकोळ कायदे, पोलीस विभागाशी निगडीत सर्व कायदे, महाराष्ट्र नागरी सेवा नियम, विभागीय चौकशी संबंधीत न्यायनिवाडे इत्यादी प्रश्नांचा समावेश असेल.

**ब) मुलाखत - २५ गुण.**

क) लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी एकूण पदांच्या ( विधी अधिकारी गट-ब १ पदे व विधी अधिकारी २१ पदे ) तीन पट उमेदवार लेखी परिक्षेतील मेरीटनुसार मुलाखतीसाठी पात्र ठरतील. लेखी परिक्षेचा व मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.लेखी परिक्षेत व तोंडी परिक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकूण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात येईल.

ड) नियुक्ती देणेसाठी उमेदवारास कमीत कमी ६०% गुण असणे आवश्यक राहील.

## कर्तव्ये व जबाबदा-या

०१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
०२. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
०३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-याच्या मदतीने तयार करणे.
०४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पहाणे.
०५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदअनुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कारवाई करणे.
०६. अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
०७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमूण दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.
०८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.
०९. कायदा, सेवा व प्रशासनासंबंधी इतर अनुषंगीक कामे करणे.
१०. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणात किंवा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता मधील कलम २१८ किंवा महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम १९९९ मध्ये मंजूरी मधील प्रकरणात अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यासाठी संबंधीत सक्षम प्राधिका-या त्यांना अभियोग दाखल करण्याची परवानगी देणे किंवा न देणे याबाबत निर्णय घेणे.

**अटी व शर्ती :-**

०१. उपरोक्त पदे भरण्याबाबत उक्त दिनांक २१.०८.२००६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ येथे करण्यात आलेल्या तरतुदीनुसार नियमीत वेतनश्रेणीत न भरता एकत्रीत वेतनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यास खालील अटींच्या आधिन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

May 17, 2023, 17:34

०२. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. या अधिकारी / कर्मचा-यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

०३. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथम ११ महिन्यांसाठी करण्यात याव्यात. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढवता येईल. तथापि, अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजी नियुक्ती प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त तीन वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे समक्ष प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

०४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिका-याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रदद करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

०५. लेखी परिक्षेत पात्र टरणा-या उमेदवारांमधून मुलाखतीद्वारे अंतिम निवड करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल. लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ व ठिकाण तसेच निकाल, अंतिम निवड याबाबतची माहिती उमेदवारांना या कार्यालयाकडून कळविण्यात येईल.

०६. उमेदवारांना लेखी परिक्षा व मुलाखतीसाठी उपस्थित रहाण्यासाठी कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

०७. नियुक्ती केलेल्या उमेदवारांस या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) करुन देणे अनिवार्य राहील. करारनामा करिता येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल.

०८. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी / कर्मचा-यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चा व्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

०९. उमेदवारांनी वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी जाहीरातीच्या दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे.

१०. अर्जासोबत २.५ से.मि. x २.५ से.मि. आकाराचे सध्या काढलेले दोन रंगीत फोटो जोडावेत.

११. विधी अधिकारी व विधी अधिकारी गट-ब भरतीसाठी उमेदवारांशी करण्यात येणारा पत्रव्यवहार हा ई-मेल व मोबाईलद्वारे करण्यात येईल.

१२. उमेदवारांनी त्यांचे अर्ज (परिपूर्ण व व्यवस्थित भरलेला विहित नमुन्यातील त्यांची स्वाक्षरी असलेला अर्ज) पोलीस अधीक्षक कार्यालय, रमणमळा, कसबा बावडा, कोल्हापूर-४१६००३ या पत्त्यावर दिनांक ३१/१०/२०२४ पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. अपूर्ण माहिती भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१३. उमेदवारांनी प्रत्येक आठवडयात किमान ३० तास काम करणे आवश्यक आहे

**विशेष पोलीस महानिरीक्षक,**
**कोल्हापूर परिक्षेत्र यांचे मान्यतेने.**

**( महेंद्र पंडित )**
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचेकरिता.



May 17, 2023, 17:34

# अर्जाचा नमूना

"विधी अधिकारी / विधी अधिकारी "गट-ब" * पदाकरिता अर्ज

| |
|---|
| एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा. |

| |
|---|
| कार्यालयीन उपयोगासाठी |
| १. अर्ज क्रमांक : ☐☐☐☐☐☐☐☐ |
| २. अर्ज स्विकारल्याचा दिनांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ |
| ३. अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह) : ____________ |

---

सूचना : अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : आडनांव नांव वडीलांचे / पतीचे नांव
मराठीत

______________________________________________

# इंग्रजीत

☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

☐

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :

______________________________________________

तालुका :____________ जिल्हा :____________ पिन कोड : ☐☐☐☐☐☐

३. कायमचा पत्ता :

तालुका :____________ जिल्हा :____________ पीन कोड : ☐☐☐☐☐☐

४. दूरध्वनी क्रमांक :- लॅन्डलाईन : ______________ मोबाईल क्रमांक : ____________

४. A. ई - मेल : ______________________________________

५. जन्म दिनांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्म स्थळ : ________________
दिवस महिना वर्ष

६. दिनांक रोजीचे वय : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ ( वयाच्या पूराव्याची एक प्रत सोबत जोडावी )
दिवस महिना वर्ष

७. लिंग : पुरूष ☐ / महिला ☐

८. धर्म : ____________________ जात:____________________

९. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय : ☐ / नाही : ☐



May 17, 2023, 17:34

☼ योग्य असेल त्या ठिकाणी ( √ ) अशी खूण करावी.

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :

१०. शैक्षणिक अर्हता :

| अ. क्र. | शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झालेचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी) अथवा जुनी ११ वी परिक्षा | | | | | |
| २. | उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२वी) | | | | | |
| ३. | पदवी | | | | | |
| ४. | विधी पदवी | | | | | |

११. इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षित आहे काय ? होय : ☐ / नाही : ☐

१२. अर्जदाराची इतर माहिती .

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेला केसेसचा तपशील :

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| | | | |

* टिप : वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १३.-अ | अर्जदारावर या पूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / बध्द करण्यात /दंड करण्यात / सिध्दोषी टरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह टरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीटाकडून किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय / काढून टाकण्यात आले आहे काय ? | होय : ☐<br>नाही : ☐ |
| १३.-ब | हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीटात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? | होय : ☐<br>नाही : ☐ |

(१३- अ किंवा १३- ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दती, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादींचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरण इत्यादी टिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री. / सौ./ कु. ______________________________ याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्या बाबतीत माझे विरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.



May 17 2023, 17:34